# प्रकरण ८

# निष्कर्ष

## निष्कर्ष :-

प्राचीन काळात मध्ययुगीन म्हाईंभट लिखीत लीळाचरित्रासारख्या चरित्र रुपाने उदयास आलेल्या चरित्र या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करत असताना हा वाङ्मय प्रकार समृद्ध तर आहेच पण त्यामध्ये काळानरुप विकास होत गेल्याचे लक्षात येते. 'चरित्र' या शब्दांची निर्मिती 'चर' या धातूपासून झाली. चरित्र वाङ्मयाचे वर्गीकरण करता चरित्र हे ललित व ललितेत्तर या दोन्हीच्या मध्यावरील प्रकार होय. फरक इतकाच चरित्र हे सत्यस्वरुपात व्यक्ति दर्शन करते. त्याचप्रमाणे चरित्र आणि इतिहास यामध्ये फरक असल्याचे दिसून येते. म्हणजे 'चरित्र' हा वाङ्मय प्रकार इतर वाङ्मय प्रकारापेक्षा वेगळा वाङ्मय प्रकार आहे.

चरित्र लेखनाची संकल्पना व स्वरुप म्हणजे काय? चरित्र लेखनामागचा उद्देश कोणता? यांचा विचार करत असताना. प्राचीन संतचरित्रे व इतिहासविरांची चरित्रे लिहिली ती समाजासमोर आदर्श निर्माण करण्यासाठी पण इंग्रजी राजवटीमध्ये जे चरित्र लेखन झाले. त्यांनी समाजाला पुढे एक आदर्श घालून दिला. चरित्र नायकाची निवड चरित्रकार आवडीप्रमाणे करु शकतो. पण चरित्र लेखन करताना त्याने चरित्रकाराचे प्रामाणिक व सत्यचित्रण करावे. कोणताही पूर्वग्रहदोषितपणा न बाळगता त्याने चरित्रलेखन करावे. पूर्वीच्या काळी चरित्र हे स्तुतीगायन करणारी होती. त्यामुळे सत्याचा अभाव दिसून येतो. पण येथे कोणताही मनुष्य हा सर्वगुण संपन्न नसतो. याचे उदाहरण म्हणजे विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेले डॉ. जॉन्सन यांचे चरित्र होय. या चरित्रामुळे चरित्रकारांची खरी भुमिका लक्षात येते.

चरित्र लेखनाची मांडणी व बांधणी नेमकेपणाने कशी करावी. यासाठी चरित्रकारांने चरित्र विषय निवडल्यानंतर उपलब्ध साधन सामग्री जमा करुन त्यांची सत्यता पडताळून पहाणे. त्यांच्या आठवणी एकत्र करणे. यासर्व उपलब्ध साहित्यावरच चरित्रकारांस समाधान मानावे लागते व यांची चिकित्सा करुन चरित्र लेखन करावे लागते. पण चरित्र लेखन करत असताना चरित्रकाराने भावनिक होऊन किंवा चरित्र नायकामध्ये न गुंतता

तटस्थ वृत्तीने लेखन करावे. तसेच घटणा, प्रसंगाची योग्य संगती लावून काळानुक्रमे इतिहास सांगावा तसेच स्वत:चे मत न सांगता नेमकेपणाने लेखन करावे म्हणजे ते रटाळ, कंटाळवाणे वाटणार नाही याची दक्षता घ्यावी.

मराठीतील पहिले चरित्र म्हणून 'लीळाचरित्र' ओळखले जाते. त्यानंतर महानुभव संप्रदायात अनेकांची चरित्रे लिहिली गेली. त्यानंतरचा काळ म्हणजे संतचरित्राचा यामध्ये संतांच्या चमत्कारांचे, दैवी घटनांचे वर्णन येते. प्राचीन काळात परमेश्वराचे नामस्मरण करुन मोक्ष प्राप्ती मिळवणे ही भावना लेखनापाठीमागे होती. त्यानंतर अनेक संप्रदाय उदयास येऊन चरित्र लेखन होऊ लागले. या काळात भर मोठ्या प्रमाणात घातली ती बखर या वाङ्मय प्रकाराने. यामध्ये महत्वाची बखर म्हणजे 'सभासद बखर' होय.

'चरित्र' लेखनाच्या विकासामध्ये अर्वाचिन कालखंडामध्ये नवे वळण दिले हे नवे वळण इंग्रजी राजवटीमुळे मिळाले. या काळात शिक्षण घेऊन नवी पिढी निर्माण झाली. आणि त्यांनी अनेक इंग्रजी चरित्रांची भाषांतरे केली. येथे कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'सॉक्रेटीसचे चरित्र' याचे भाषांतर केले. पण परकियांचे चरित्र लेखन केले असले तरी अव्वल इंग्रजी कालखंडात मान मिळतो तो स्वकिय चरित्राला ते चरित्र म्हणजे 'राजा प्रतापादित्याचे चरित्र' होय. यानंतर परकियांच्या कुबड्या फेकून देऊन स्वकियांनी स्वतंत्र चरित्र लेखन करुन मराठी चरित्रामध्ये क्रांती घडवून आणली. येथे संतांची, राजांची, चरित्रे लिहिण्यापेक्षा सामान्याच्या जीवनावर लिहिलेली चरित्रे व्यवहारात उपयोगी पडतात हे लक्षात आल्यानंतर 'डॉ. जॉन्सन' यांच्यावर चरित्र लिहिले गेले.

१९८० नंतर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक बदल घडून आल्यामुळे व्यक्तिमानावर परिणाम झाला. तसेच शिक्षणाच्या प्रसारामुळे स्त्रीयां शिक्षण घेऊन आपले दु:ख मांडू लागल्या. तसेच राजकीय क्षेत्रात नाव मिळवलेल्या व्यक्तिंची चरित्रे, क्रिडाक्षेत्रात, कलाक्षेत्रात नाव मिळवलेल्या व्यक्तिंची चरित्रे लिहिली जावू लागली. म्हणजे चरित्र लेखनाच्या विकासाचा आढावा घेत असताना लक्षात येते की चरित्र लेखनाचा उद्देश व हेतू कोणताही असो पण त्यातून शिकण्यास भरपूर मिळत होते.

'चरित्र' लेखनाचा आढावा घेताना 'चरित्र' म्हणजे काय. यावरती अनेक तज्ज्ञ व्यक्ती आपली मते सांगतात. 'चरित्र' म्हणजे व्यक्तीच्या संपूर्ण जीवीताचा कालखंडाचा

आढावा होय. तर काही म्हणतात 'चरित्र' मानवी जीवनाचा इतिहास आहे. म्हणजे चरित्र म्हणजे काय? हे तज्ज्ञ व्यक्ती आप-आपल्या परिने सांगतात. तसेच पाश्चात्य-पौर्वात्य ही आपली मते व्यक्त करतात. येथे डॉ. आंबेडकर सांगतात चरित्र नायकाचे दैवतीकरण करु नये व दानवीकरण करु नये करावे ते मानवीकरण कारण तो शेवटी मानवच म्हणून जगत असतो. काहींना वाटते 'चरित्र' हे संमिश्र आहे. एका अंगाने ते कादंबरीसारखे तर दुसऱ्या बाजून चरित्रनायकाची 'कथा' असते. चरित्रलेखन करत असताना चरित्र नायकाच्या गुणदोषांचे वर्णन आले पाहिजे असे धनंजय कीर यांना वाटते. तसेच 'टिळक चरित्र' लिहिताना केळकर म्हणतात, आम्ही चरित्र लेखन करतो ते पुढे कोणास चरित्र लिहावयाचे असल्यास त्याला ते उपयोगी पडावे. आणि त्यांचा वापर व्हावा म्हणून तर काहींना 'चरित्र' हा वाङ्मय प्रकार योग्य नाही असे वाटते. कारण एका व्यक्तीचे चरित्र दुसऱ्या व्यक्तीने उपलब्ध साधन सामग्रीच्या आधारे लिहावे हे योग्य वाटत नाही. म्हणजे 'चरित्र' लेखनाचे विविध पैलू येथे स्पष्ट होतात.

चरित्रात्मक साहित्य लेखनामागे चरित्रकारांच्या काही प्रेरणा असल्याच्या दिसतात. काही चरित्रकार आपल्या प्रिय व्यक्तींची आठवण म्हणून व आदर-भाव म्हणून लेखन करतात. तर अर्वाचीन काळात इंग्रजी कालखंडात शिक्षण घेऊन नवी पिढी निर्माण झाली. त्यांना आपल्या शिक्षणाचा समाजाला फायदा व्हावा या प्रेरणेतून लेखन झाले. थोर पुरुषांच्या चरित्राच्या प्रभावामुळे काहींनी लेखन केले. तसेच अर्थप्राप्तीसाठी लेखन झाल्याचे दिसून येते. म्हणजे चरित्र लेखन करत असताना. चरित्रकार कोणत्या भावनेतून लेखन करतो हे दिसून येते. 'चरित्र' या वाङ्मय प्रकारात पूर्वी श्रद्धेवर व भक्तीवर आधारलेला होता. पण आधुनिकतेमध्ये सत्याचा स्विकार करणारा ठरला.

मराठी साहित्यात आपले वेगळे स्थान असलेला दिर्घ परंपरा असून अनेक वळणे घेत मान्यता पावलेला आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार आहे. आत्मचरित्र आयुष्याच्या संध्याकाळी एकदाच लिहिले जाते. तसेच आत्मचरित्र हा शब्द **'Autobiography'** या इंग्रजी शब्दापासून रुढ झाला. आत्मचरित्र म्हणजे स्वत:च्या गतकाळाचे सिंहावलोकन व विश्लेषण करणे होय.

आत्मचरित्र लेखन करण्यापाठीमागे आत्मचरित्रकारांची भूमिका कोणती असते. आपल्या आठवणी दुसऱ्याला सांगण्यासाठी आपल्या चुकींची कबुली देण्यासाठी, तसेच विरंगूळा म्हणून ही लेखन केले जाते. त्यांचबरोबर आपल्या आयुष्यातील अडचणी कश्या आल्या त्यांना कसे सामोरे जावे लागले. हे सर्व सांगण्यासाठी आत्मचरित्र लिहिले जाते. यावरती अनेक तज्ज्ञ अभ्यासक आपली मते नोंदवतात. तसेच या कालखंडाचे एकून चार भाग पडतात. पहिल्या कालखंड म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळातील आत्मचरित्रे या काळात रुढ अर्थाने अल्प आत्मचरित्र लेखन झाले. यामध्ये पहिले आत्मचरित्र बाबा पदमजी यांचे 'अरुणोदय' होय. तसेच दुसरा कालखंड म्हणजे स्वातंत्रोत्तर कालखंड होय. या कालखंडात आत्मचरित्र हा वाङ्मय प्रकार बहरलेला दिसतो. या कालखंडातील वैशिष्ठ्यपूर्ण आत्मचरित्र म्हणजे प्र. के. अत्रेंचे 'मी कसा झालो' हे होय. या कालखंडात प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तिनी आपले अनुभव कथन केले आहेत. तिसरा कालखंड म्हणजे स्त्री आत्मचरित्रे होय. येथे मराठी दालन वैभवशाली करण्यात स्त्रीयांचा वाटा मोलाचा आहे. चौथा व शेवटचा कालखंड दलित आत्मकथने होय. या चार प्रवाहांमुळे मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराने आपले वेगळेपण सिद्ध केले.

आत्मचरित्र लिहिण्यापाठीमागे 'स्वांत सुखाय' ही भूमिका असते. स्वत:ला सुख मिळावे म्हणून आत्मचरित्र लिहिले जाते. तसेच स्वत:ची जडण - घडण, संस्कार आणि आपल्या आयुष्यावर झालेला परिणाम सांगत असतात. तसेच आत्मचरित्र लेखनामागे जसे 'स्वांत सुखाय' हेतू असतो तसेच इतरांसमोर आदर्शाची उभारणी करण्यासाठी लेखन केले जाते. आपल्या हातून झालेल्या चुका दुसऱ्याकडून होऊ नये म्हणून लिहिले जाते. तसेच आपल्या बद्दल जर अपसमज झाला असेल तर तो दुर करण्यासाठी आत्मचरित्र लिहिले जाते. म्हणजे आत्मचरित्रे आत्मगौरव करण्यासाठी लिहिली जातात.

आत्मचरित्रामध्ये आपल्या आयुष्यातील व जगण्यातील वेगळेपणाचा अनुभव इतरांना प्रेरणा देणारा होऊ शकतो. तसेच त्यांना बोध होऊ शकतो किंवा आनंद देण्याचे काम करु शकतो. अशाच वळणाचे जर्मन प्रोफेसर मॅक्समुल्लर यांनी तरुण विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देणारे आत्मचरित्र लिहिले. तसेच साहित्यस्वरुपात आत्मचरित्राविषयी स्पेंजमन आपले मत मांडतात? तसेच सुरेंद्रनाथ कांबळी या अंध उद्योजकाने 'बदलती

क्षितीजे' मधून आपल्या अनुभवाची 'अभंग गाथा' कथन केली आहे. या प्रेरणा घेऊन अनेक आत्मचरित्रकार लेखनास प्रवृत्त झाले. आणि आत्मचरित्राच्या संख्येत मोलाची भर पडली. आत्मचरित्रामध्ये आदर्श म्हणून अनेक आत्मचरित्रे आली. यामध्ये 'महात्मा गांधीजी' यांचे आत्मचरित्र त्यामध्ये प्रत्येक ओळीत सत्योपासना आहे. अशा वाचनामुळे वाचकांच्या मनात आदर्श आत्मचरित्रे म्हणून ही उभी राहतील. अशाच स्वरुपाचे फ्रेंच लेखक यांचे 'कबुली जबाब' **'Confession'** हे आत्मचरित्र होय. म्हणजे जेव्हा आत्मचरित्रांकडे आदर्श म्हणून पाहतो तेव्हा त्याला सदोष व दोष या दोन्ही बाजू असल्याच पाहिजेत. तेव्हा ते समाज्यापुढे आदर्शाची उभारणी करु शकतात.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षण प्रसार होऊन दलित वर्ग शिकू लागला आणि डॉ. आंबेडकरांच्याकडून प्रेरणा घेऊन आपले दु:ख साहित्यात मांडू लागला. तसेच दलितांनी ही आपल्या बुद्धीच्या जोरावर दाखवून दिले शिक्षण हे केवळ व्यक्तिगत नसून सार्वजनिक साधन आहे. १९६० नंतर दलित वर्गातील समीक्षकांकडून त्यांची बाजू मांडली जाऊ लागली. यातून ते आपल्या हक्कासाठी भांडू लागले. मनुष्य हा जन्माने समान आहे. हा विचार प्रामुख्याने त्यांनी सांगितला. आत्मचरित्रातून आपले दु:ख मांडत असताना १९व्या शतकात आत्मकथन या नविन साहित्यप्रकार उदयास आला यातून आपले व आपल्या समाजाचे दु:ख अत्यंत उठावदार रितीने ते लिहू लागले यामुळे या आत्मकथनाने दलित लेखकांच्यामध्ये जागृती निर्माण केली.

आत्मलेखन करण्यापाठीमागचा लेखकाचा हेतू म्हणजे आपल्या जीवनाचा वृत्तांत निवेदन करणे होता. म्हणजे आपल्या आयुष्यात आलेले अनुभव आयुष्याच्या संध्याकाळी, आठवणींच्या जोरावर वाचकांना सांगणे. आत्मचरित्राचा अभ्यास करत असताना त्यांचे वेगळेपण लक्षात येते. इतर वाङ्मय प्रकारापेक्षा हा वेगळा वाङ्मयप्रकार आहे. आत्मचरित्र हे स्वत: तो व्यक्तीच लिहू शकतो. तसेच ते आठवणींवर आधारीत असल्यामुळे त्यामध्ये सत्यता पाहणे कठीण असते व लेखन करीत असताना लेखकाला तटस्थपणे लेखन करावे लागते. त्यामध्ये अनेक अडचणी येतात. त्याला बळी न पडता शेवटपर्यंत नेटकेपणाने लेखन करावे लागते. म्हणजे आत्मचरित्र लेखन करत असताना आत्मसमाधान हाच खरा फायदा असलेला दिसून येतो.

आत्मकथनामधून समाजाने व वर्णव्यवस्थेने जे गुलामीचे जीणे लादले होते याचे वर्णन आले आहे. या साऱ्याला नकार देऊन डॉ. आंबेडकरांच्या चळवळीने प्रेरणा घेऊन अनेक दलित लेखक लेखन करु लागले. यातून त्यांच्या वेदनेचा आक्रोश मांडलेला आहे. त्याचप्रमाणे गेल्या पंचवीस वर्षापासून आत्मकथन वाङ्मय प्रकाराचा प्रारंभ झाला. १९७५ साली 'रामनगरी' हे आत्मकथन आले. पण त्याची फारशी चर्चा झाली नाही. त्यानंतरच 'बलुत' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले आणि आत्मकथन लेखनाने जोर धरला. म्हणजे या आत्मकथनामधून मांडलेले दु:ख मी ही भोगले आहे. याची जाणिव होऊन अनेकजण लेखन करु लागले. त्यामध्ये दलित आत्मकथनाने मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले.

'बेरड' व 'उचल्या' या आत्मकथनाची प्रेरणा घेऊन भटक्या जमातींच्या आत्मकथनांनी साहित्यात प्रवेश केला. त्यानंतर अनेक जातवार आत्मकथने प्रसिद्ध झाली. यातून आपल्या जातीचे दु:ख मांडू लागली. त्याचप्रमाणे अधीच दीन समजल्या जाणाऱ्या आणि दलित समाजात जन्माला आलेल्या स्त्रीया लेखन करुन आले दु:ख सांगू लागल्या. प्रा. कुमुद पावडे यांचे 'अंत:स्फोट' हे आत्मकथन होय. तसेच विकासापासून वंचित असलेला असा मराठवाडा विभागात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुधारणा झाली. पण जातीभेद मात्र तसेच राहिल्यामुळे त्यांनी आपले अनुभव 'आरनीच्या धना' या आत्मकथनातून मांडले. आत्मकथनातून सर्व स्तरातील लोकांनी आपले दाहक अनुभव सांगताना आपण लेखन करण्यापाठीमागचा हेतू ही लिहितात. या वाङ्मय प्रकारामध्ये सर्व स्तरांमध्ये उस्फुर्तरित्या लेखन झाले आहे.

आत्मकथन व आत्मचरित्र हे दोन्ही वाङ्मय प्रकार जुळी भावंडे आहेत. या दोन्हीमध्ये त्यांनी भोगलेल्या दु:खाची गाथा दुसऱ्यासमोर जीवनानुभूती म्हणून मांडली जाते. तसेच सत्यकथन केले जाते. यावरुन हे दोन्ही वाङ्मय प्रकार एकमेकांचे प्रतिबिंब आहेत. पण त्यामध्ये काही सादृष्य भेद आहेत. आत्मचरित्र आयुष्याच्या संध्याकाळी लिहिले जाते तर आत्मकथन ऐन उमेदीच्या काळात लिहिले जाते. आत्मकथन कथेच्या अंगाने लिहितात. तर आत्मचरित्र इतिहासाच्या अंगाने लिहिले जाते. तसेच आत्मचरित्रे गतायुष्यातील अनुभवांनी भरलेली असतात. तर आत्मकथन दु:खभोगांनी भरलेली असतात म्हणजे आत्मकथन व आत्मचरित्रे यामध्ये काही सीमारेषा आहेत ते स्पष्ट होते.

स्वातंत्र्योत्तर काळात जन्मास आलेल्या हा वाङ्मय प्रकार जीवनवादी साहित्य प्रकार ठरला. शिक्षणाने जागृत झालेला तरुण पिढीला अन्यायांची जाणीव होऊन ते लेखन करु लागले. तसेच 'आत्म' हा शब्द 'आत्मन' या शब्दापासून निर्माण झाला. तसेच आत्मकथनाविषयी अनेक संज्ञा ही वापरतात. आत्मकथनकाराने आपले अनुभव कथन करताना 'स्व'ला आवर घालावी लागते. या संदर्भात प्रा. केशव मेश्राम आपले विचार व्यक्त करतात? तसेच अनेक साहित्यिक आपली मते मांडताना दिसतात. तसेच आत्मकथन लिहिणारे यांनी उत्तुंग कामगिरी केली म्हणून लेखन करतात. असे नाही ते आपले जीवन जगत असताना आलेल्या अनुभवाचे कथन करण्यासाठी लेखन करतात. त्यामुळे या वाङ्मय प्रकाराकडे साहित्याचे लक्ष तर वेधले आहे. तसेच पंडितांचे लक्ष वेधण्याचे काम त्यांनी केलेले आहे.

आत्मकथनाचे स्वरुप म्हणजे आपल्यावर झालेला अन्याय, दुःख दुसऱ्याला सांगणे. तसेच त्यामुळे तो कथन करताना विशिष्ठ समाजाचे प्रतिनिधित्व करत असतो. तसेच आत्मकथनाला दोन अंग असतात. एक भौतिक व दुसरे आत्मिक. या दोन्हीचा वापर करुन लेखन केले जाते. यातून त्यांनी त्यांचा संघर्ष सांगितला आहे. त्यांच्या प्रमुख गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठीचा झगडा सांगतात. हा संघर्ष ते अत्यंत निर्लेपमनाने करत असल्याचे दिसते. म्हणजे आत्मकथन लिहिणाऱ्या दलित वर्गाचा अभावग्रस्त समाजाचा दुःखाने भरलेला इतिहास असतो.

आत्मकथन लिहिण्यापाठीमागे मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून मिळाली. त्यांनी 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा मंत्र घेऊन नवीन पिढी शिकून आपले दुःख मांडू लागली. त्याचबरोबर दारिद्रय आणि दुःख हे आत्मकथन लेखनापाठीमागे प्रमुख प्रेरणा असल्याचे दिसते. स्त्रीयांनी आपले दुःख मांडण्यासाठी या वाङ्मय प्रकाराचा उपयोग केला. तसेच अनेकांनी आत्मकथन लिहिलेली दिसतात. त्यापाठीमागे एकच दृष्टी असलेली दिसते. ते म्हणजे आपले दुःख सांगणे.

आत्मकथनाची प्रेरणा अभ्यासल्यानंतर आत्मकथनाची परंपरा काय आह? यांची सुरुवात केव्हा पासून झाली याची सुरुवात संत वाङ्मयापासून झाली. म्हणजे आत्मकथन लेखणाची परंपरा जुनी असल्याचे दिसते. त्यानंतर काळानुक्रमे अनेक आत्मकथने

साहित्यात येऊ लागली. तसेच साहित्यात या वाङ्मय प्रकाराने आपली परंपरा घालून दिली. आत्मकथन लेखन प्रामुख्याने दलित वर्गाने मोठ्या प्रमाणात केले. येथे ते जगापासून दूर असणाऱ्या आणि त्यांची तिळमात्र ही कल्पना नसलेल्या अशा लोकांनी आपली आत्मकथने लिहिली आहेत. यामध्ये असलेला प्रमाणिकपणा व वास्तवाशी जवळीक त्यामुळे ही आत्मकथने वाचकांच्या मनाला भावलेली दिसतात.

१९ व्या शतकात उदयास आलेल्या या वाङ्मय प्रकाराला २० व्या शतकात शिक्षणाने आत्मभान आले. त्यांना लेखणीचे व वाणीचे सामर्थ्य गवसले. कथा, कादंबरी, नाटक व प्रवास-वर्णनांपेक्षा आत्मकथन हा नविन वाङ्मयप्रकार आहे. आत्मकथनाच्या मांडणीमध्ये तसेच सत्यकथन यामुळे त्यांचे वेगळेपण दिसून येते. आत्मकथन 'मी' चे प्रतिनिधित्व करते. त्याचबरोबर संपूर्ण समाजाचे दर्शन घडविते. तत्कालिन वास्तवाचे विदारक दर्शन घडविण्याचे काम आत्मकथन करते. तसेच आत्मकथनाकडे कलात्मक दृष्टीने ही पहाता येते. आतापर्यंत आत्मकथनांचा विचार करता. तथाकथित साहित्य प्रकारांचे संकेत, आकृतीबंध झुगारुन देऊन त्यांनी लेखन केले आहे. त्यामुळे आत्मकथनाला रुढ साहित्य प्रकाराच्या चौकट लावता येत नाहीत. तसेच मराठीतील आत्मकथनांकडे दृष्टी टाकली असता असे लक्षात येते की, ही आत्मकथने वेगवेगळ्या जाती जमातींचे, तसेच विशिष्ठ प्रदेशाचे आणि गावकूसाबाहेरील जगाचे दर्शन घडविते. म्हणजे आत्मकथने ही माणासचे जीवनचित्रण करतात असे नाही तर निसर्गाचे, प्रदेशाचे चित्रण करताना दिसून येतात. तसेच या विविध स्तरातील लेखकांनी लिहिलेल्या आत्मकथनामुळे मराठी भाषेच्या शब्दसंग्रहात ही मोलाची भर पडली आहे. त्यामुळेहा वाङ्मयप्रकार वाचकसापेक्ष बनला आहे.

साहित्य हे समाजाचे मुख्य अंग आहे. त्यामुळे समाज बदललाकी, साहित्यही बदलते. तसेच साहित्यात समाजपरिर्वन घडवून आणण्याची फार मोठी शक्ती असते. त्यांच वळणाची दलित आत्मकथने आहेत. यामध्ये दलित म्हणजे काय? यावरती अनेक अभ्यासकांनी आपले विचारही व्यक्त करता. तसेच दलित साहित्यामागील प्रमुख प्रेरणा डॉ. आंबेडकरांची विचारप्रणाली आहे. तसेच भगवान बुद्ध, कार्लमार्क्स आणि महात्मा फुले यांचा ही दलित साहित्य निर्मितीपाठीमागे मालाचा वाटा असल्याचे दिसते. डॉ. आंबेडकर

याचबरोबर सांगतात की लेखनी फक्त स्वत:पुरती व आपल्या जमातीपुरती मर्यादित ठेवू नका त्यांच्या कक्षा रुंदावण्यास सांगतात.

आत्मकथनांपाठीमागच्या प्रेरणेचा विचार करत असताना आत्मकथनांची पार्श्वभूमी काय आहे? म्हणजे पूर्वी आत्मकथन दु:ख, वेदना मांडण्यासाठी लिहिले जात होते. पण आता शिक्षणाने त्यांच्या आचार विचारात बदल झाला आहे. ते आपल्या हक्कासाठी झगडू लागले आहेत. त्याचप्रमाणे स्त्रीयांही आपली होणारी कुचंबना व छळ याविषयी लेखन करत आहेत. पण वेगळ्या अर्थाने लेखन केलेले आत्मकथन 'भटक्या' हे प्रसिद्ध झाले. आणि आत्मकथनातून गावातही स्थान नसलेल्या अशा विदारक समाजाचे चित्रण वाचकांस वाचण्यास मिळाले. म्हणजे ही नवी आत्मकथने वाचत असताना जाणवते. शिक्षणाने माणूस कितीतरी सुधारला तरी त्यांच्या विचारात सुधारणा झाली नाही हे दिसून येते.

आत्मकथनाचा अभ्यास करत असताना मराठीत जी नवीन आत्मकथने आली. त्यांनी वेगळा विचार साहित्यात मांडला. १९६० नंतर बहूजन समाजाकडे साहित्याचा कल वाढला. एकविसाव्या शतकात लेखन झालेल्या आत्मकथनातून 'माणूस' म्हणून जगण्यास हक्क मिळून सुद्धा 'माणूस' म्हणून वागणूक मिळत नाही याचे दु:ख व्यक्त झाले. म्हणजे मानवाने रचलेल्या प्रगतीचा इतिहास पहाता आणि दलित आत्मकथनामधील वेदना, दु:ख पहाता मानव अजूनही अप्रगत असल्याची जाणीव होते.

आत्मकथनामधुन येणाऱ्या स्त्रीया या आज सुशिक्षित आहेत. नोकरी करतात पण तिला समाज, ऑफिस, घर या तिन्ही ठिकाणी मिळणारी वागणूक, तिला करावी लागणारी कसरत यांचे दु:ख स्त्रीया मांडू लागल्या आणि त्याहीपेक्षा दलित स्त्रियांचे जीवन अधिकच यातनांचे व कष्टाचे असते आणि हे सर्व त्या मुकपणे सहन करीत जगताना दिसतात. येथे स्त्री म्हणून असलेला दुय्यम दर्जा आणि तिला सहन करावे लागणाऱ्या दु:खाची गाथा येथे येते.

साहित्य निर्माण होण्यासाठी आगोदर तिची वैचारिक पार्श्वभूमी तयार व्हावी लागते. म्हणजेच दलित साहित्या निर्मितीमागे प्रमुख कारण म्हणजे त्यांचे दु:ख होते. तसेच दलित म्हणजे कोण? जो जन्माने दलित आहे. त्याने लिहिलेले साहित्य दलित साहित्य मानले जात होते. लेखकाचा आणि समाजाचा विचार करता तिथल्या भाषेचा ही विचार केला

जातो. म्हणजे लेखन करताना त्याच्या आवतीभोवतीच्या वातावरणाचा ही विचार साहित्यात केला जात असे. तसेच चळवळीमागे मुख्य कारण म्हणजे शिक्षण आणि स्वातंत्र्य होय. यामुळे दलित वर्ग आपले विचार, भाव-भावना मांडू लागले. थोडक्यात चळवळीमागे मुख्य कारण म्हणजे आत्मोद्धार आणि हजारो वर्षे सोसत आलेल्या अन्याया पासून स्वतःला व समाजाला मुक्त करणे हेच असल्याचे दिसून येते.

बदल हा सृष्टीचा नियम आहे. त्याप्रमाणे जीवन बदलते. तसेच साहित्यही जीवनानुसार बदलते. नव्या साहित्यामुळे भाषेत, अभिव्यक्तीत आशय, अनुभव व जीवनदर्शनात ही बदल होतो. त्यामुळे साहित्य हे अमुर्त आहे. ज्याप्रमाणे काळाची गरज म्हणून आत्मकथन साहित्यप्रकार निर्माण झाला. हा बदल वाचकांच्या आवडीमुळे व समाजाच्या विचार करुन केलेला आहे. इथे काळ बदलल्यामुळे पांढरपेशाच्या हाती असलेल्या लेखनी आता दलितांच्या हातात आली आहे. त्यामुळे तळागाळातील दलित आपली मते मांडू लागले आहेत. आणि असे ही जग आहे. अशा परिस्थितीत ही लोक जीवन जगत आहेत याची जाणीव नवीन आत्मकथनाने करुन दिली आहे. येथे प्रेम कहाणी हे साहित्य नसून वेगळे विश्व आहे हे मांडणे म्हणजे साहित्य निर्मिती होय.

गणेश चौधरींचा जन्म जळगांव जिल्ह्यातील यावळ तालुक्यातील डांभूर्णी येथील श्रीमंत कुटुंबात झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध वकिल होते व आई गृहिणी होती. मोठी बहिण व छोटा भाऊ असे त्यांचे कुटुंब होते. त्यांचे बालपण वडिलांच्या प्रतिष्ठेखाली आणि आईच्या प्रेमासाठी असूसलेले राहिले. त्यांच्या बालपणी त्यांना धक्का बसणारी गोष्ट म्हणजे ताईचा मृत्यु होय.

गणेश चौधरींची संपूर्ण शिक्षण शहरात झाले. त्यांनी बी. ए. नंतर बी. एड्. साठी सन १९६२-६३ साली प्रवेश घेतला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर गावात स्व-कष्टावर शाळा बांधून विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे कार्य सुरु केले. त्यांनी त्यांच्या शाळेत सर्व सण साजरे केले आणि विद्यार्थ्यांसाठी काम करताअसताना त्यामध्ये स्वतःला झोकून देत असत. जेव्हा त्यांना 'भास' होऊ लागले. तेव्हा त्यांनी राजीनामा दिला. आपल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये ऐवढीच इच्छा असलेली दिसते. चौधरींचे वेड म्हणजे 'हॅल्युसिनेशन्स' होते. त्यांना भास, भ्रम, संशय आणि चक्कर येत असत. 'लोक काहीही बोलतात' असे ते

सारखे सांगत याप्रमाणे 'मन चिंती ते वैरी ही न चिंती' याप्रमाणे हे सर्व त्यांच्या मनाच्या कल्पनाशक्तीचे खेळ होते. वास्तविक तसे काहिही नव्हते. या वेडाला भरती आली ती सतराव्या अठराव्या वर्षापासून आणि ते वाढत गेले. येथे चौधरींच्या बाबतीत अत्यंतिक भिती हेच वेडाचे मुळ कारण ठरले. आणि हे वेड डॉक्टरांनाही समजले नाही. ते घरच्यांना कसे समजणार. या वेडाचे मुळ कारण म्हणजे लहानपणापासून झालेले आघात. दिवाकरच्या जन्मामुळे त्या लहान मनाने केलेली चिकित्सा आणि ताईचा मृत्यु, आईच्या प्रेमापासून वंचित राहिलेले हे बालमन दिसते. माणूस म्हंटल्यावर त्याला मन असते. तसेच त्यात सृष्ट व दृष्ट या दोन्ही प्रवृत्ती असतात त्यांच्या भावभावनांना योग्य वाट न मिळाल्यामुळे चौधरींची ही वाताहात झाली आहे.

त्यांना वेडाचे झटके येत त्या झटक्यात ३० जून १९६८ रोजी त्यांच्या हातून आपल्या प्रिय व्यक्तींच्या हत्या झाल्या. त्यावेळी त्यांची अवस्था स्क्रिझोफ्रेनिया मध्ये दिवाकर चौधरींनी वर्णन केली आहे. त्यानंतर सुरु होते कोर्टाचे चक्र. येथे पहिल्यांदा कोर्टात कबुली दिल्यामुळे त्यांना फाशी होते. पण गांधीजन्मशताब्दी निमित्ताने त्यांची फाशीची शिक्षा माफ होते. त्यांना मनोरुग्णालयात उपचारासाठी पाठविले जाते. डॉ. अडबेंच्या प्रयत्नाने त्यांनी वापरलेल्या उपचारामुळे त्यांच्याकडून चांगले लेखन लिहिले जाऊ लागले. जेव्हा त्यांना मनोरुग्णालयात आणले गेले त्यावेळी त्यांना काही समजत नव्हते. पण या वह्यांच्या माध्यमातून त्यांच्या भावभावना व्यक्त करण्यास त्यांना वाट मिळाली होती. त्यांनी अनेक पत्रे लिहिली होती. कविता, एकांकिका, लेखन केले होते. त्यांनी पागलखान्यात अनेक सण साजरे केले. तसेच १९७२ साली त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मनोरुग्णाची कैफियत मांडली.

मनोरुग्णालयात असताना चौधरी यांचा 'तृषार्त' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. या कवितासंग्रहाला 'केशवसूत पारितोषिक' मिळाले होते. या कवितांचा जन्म डॉ. अडबे यांनी दिलेल्या वह्यांमधून झाला होता. त्यानंतर त्यांनी अनेक पत्रे आपल्या नातेवाईकांना लिहिली. याही पत्रांच जन्म त्या वहीतूनच झाला. तसेच त्यांनी 'सुर्य मध्यरात्रीचा आणि दोन एकांकिका' या एकांकिकेचे लेखन केले. तसेच त्यांच्या जीवनावर आधारीत दिवकार चौधरींनी लिहिलेले 'स्क्रिझोफ्रेनिया' हे पुस्तक यातून चौधरी यांचे जीवन स्पष्ट दिसते.

म्हणजे चौधरी हे साहित्यिक व कवी म्हणून प्रसिद्धी मिळाली ती त्यांना मनोरुग्णालयात असताना.

जेलमधून सुटका झाल्यानंतर त्यांना जळगावला ठेवण्यात आले. तिथे त्यांनी आपला कवी मित्रांचा कंपू तयार केला. अनेक साहित्य संमेलनात आपल्या कविता वाचून दाखविल्या. त्यानंतर ते डांभुर्णीला मळ्यात रहाण्यास गेले. तेथे हे त्यांचे कवी जमत होते. या संदर्भात विठ्ठल वाघांची आठवण 'स्क्रिझोफ्रेनियात' दिवाकर चौधरी सांगतात त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली म्हणून डॉ. बेंडाळे यांच्याकडे उपचारासाठी ठेवण्यात आले. त्यावेळी त्यांना आणखी शॉक दिले आणि त्यानंतर काही ट्रिटमेंट चालूच ठेवण्यात आल्या. त्यानंतर चौधरींनी आत्महत्येचा प्रयत्न केला होता पण सुदैवाने ते वाचले होते. तसेच डॉक्टरांनी दिवाकरला या संदर्भात कल्पना दिली होती.

डॉ. बेंडाळेंनी चौधरींना घरी नेण्यास सांगितले होते. त्यांना वांती (उलट्या) झाल्या होत्या. त्यावेळी दिवाकर चौधरींनी शीतलला गणेश दाला दत्तक देण्याचे ठरवितात. त्याप्रमाणे संपूर्ण कार्यक्रम ही करतात. एकदा आपल्या 'दा' ला दिलेला शब्द ते पूर्ण करतात. या दत्तक विधीमुळे गणेश चौधरींच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. दत्तक विधीनंतर त्यांची प्रकृती आणखी ढासळली आणि तो काळा दिवस उगवला. २१ एप्रिल १९८२ रोजी गणेश चौधरी मरण पावले. यावेळी त्यांच्या अंत्ययात्रेत अनेक जण सामिल झाले होते. त्यावेळी निळकंठ महाजन व सुरेश चौधरी यांनी भरलेल्या अंतकरणाने त्यांना कविता म्हणून श्रद्धांजली दिली. यांची दखल अनेक दैनिकांनी घेतली तसेच नभोवाणीवर त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. पण आता वादळ थांबले असले तरी प्रचंड पोकळी मात्र निर्माण झाली होती. गणेश चौधरी सारख्या व्यक्ती कधी मरत नसतात त्या साहित्याच्या रुपाने वाचकांच्या मनात घर करुन बसलेल्या असतात.

आत्मकथनातून एका मनोरुग्णाने जाणीवेत आल्यावर आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. यातून त्यांच्या मन:स्थिती आणि वैशिष्ठ्यपूर्ण मनोरुग्णतेचा इतिहास सांगितलेला आहे हे आत्मकथन एका संवेदनशील कवीचे आत्मकथन आहे. या आत्मकथनाने साहित्यात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. तसेच या आत्मकथन

लेखनाचा हेतू, आपल्या सारखा आजार कोणास झाला तर यांचा उपयोग त्याला व्हावा म्हणून ते लेखन करतात.

गणेश चौधरी आपल्या लहानपणीच्या आठवणी येथे सांगतात. या आठवणींचा त्याच्य बालमनावर कसा परिणाम झाला आणि त्याच्या मनात 'इड'ची कशी निर्मिती झाली. वयाच्या सातव्याा वर्षापासून त्यांना 'स्क्रिझोफ्रेनिया' जडला होता. दिवाकरचा जन्म ही पहिली घटना, ताईचा मृत्यु आणि वडिलांच्या प्रतिष्ठेचा त्यांच्या मनावर असलेले दडपण त्यामुळे त्यांचे मन कसे दडपले गेले. तसचे साधू महाराजांनी केलेले भविष्यवाणी खरी ठरली होती. आणि त्यांच्या जीवनात वयाच्या तीसाव्या वर्षी आलेलं वादळ त्यांच्या हातून घडलेले हत्याकांड आणि आठवणीने त्यांच्या मनाची होणारी होलपट त्यांना सांगितली आहे. तसेच त्यांनी मनोरुग्णालयातील आठवणी आणि तिथल्या कर्मचाऱ्यांनी दिलेले प्रेम, त्यामूळे त्यांच्या मनात त्यांच्या विषयी असलेला जिव्हाळा व्यक्त होतो. आपल्या पती पत्नीच्या एकांतातील बोलणे दूसरे ऐकत आहेत असा संशय घेत व लोक आपल्याला काहीही बोलतात. असा त्यांच्या मनात भ्रम होता. या वेड्या विचारांचा प्रत्यय त्यांच्या शेवटच्या प्रकरणात येतो. येथे त्यांची चाललेली बडबड, शब्दांचे चिरफाड आणि विचारांचे अखंड चक्र, त्यामध्ये ते अडकलेले दिसतात. या आत्मकथनामध्ये लेखन करतातना त्यांच्या मनाचा तोल ढासळलेला आहे. आणि काय लिहिले आहे? यांचे भान त्यांना राहत नाही. आणि ते दुसरीकडेच भरकटत जात आहत तसेच येथे ते आठवणी आठवेल तसे लेखन करतात आणि काही आठवणी त्यांना सांगितलेल्या आहेत या आत्मकथनात त्याच्या 'मनोदुभंतेच्या' खुणा दिसतात. हे आत्मकथन एका दुदैवी जीवाची शोकांकिका आहे. तरीही या व्यक्तीमत्वाबद्दल अनेकांनी लेखन केले आहे. हे आत्मकथन मनोरुग्णांची दु:खी व्यथा मांडणारे पहिलेच आत्मकथन साहित्यात आले. त्यामुळे मनोरुग्ण आणि समाज यांच्यातील दरी कमी होण्यास मदत झाली आहे.

संवेदशनशील मानाचे गणेश चौधरी हे वेडे होण्यामागे मुख्य कारण म्हणजे त्यांचे 'काचेचं मन' होते. त्यांना वाटे आपले विचार, मन सर्वांना समजते. पण वस्तुत: तसे काही नव्हते. त्यांना होणारे भास, भ्रम, चक्कर हेच त्यांचे वेड होते. याची सुरुवात लहानपणी दिवाकरच्या जन्माने झाली. त्या कोवळ्या मनाने या घटनेची चिकित्सा केली तसेच

घरातील वातावारण, वडिल सतत आजारी असत, आई शेतात जाई, त्यानंतर ताईच्या मृत्युमुळे त्यांचे वाढलेले एकाकीपण दिसून येते. तसेच प्रतिष्ठेमूळे व संस्कारांमुळे नैसर्गिक कामविकारांचे अकारण दमन होत गेले. तसेच स्वत:च स्वत:चे कठोर आत्मनिरिक्षण करने आणि आपल्याला काहीतरी झाले आहे ही भावना निर्माण होत गेली होती. म्हणजे चौधरींना 'स्क्रिझोफेनिया' झाला त्यावेळी त्यांना होत असलेला त्रास ते सांगतात.

'नागवा' या आत्मकथनात त्यांच्या अवती भोवती असणाऱ्या व त्यांना सावरणाऱ्या व्यक्तींचे रेखाटन आले आहे. त्यांनी आपल्या वडिलांच्या स्वभावाचे गुणविशेष सांगतात. तर आईच्या व ताईच्या प्रेमळपणाचे वर्णन करतात. आपल्या पत्नीच्या सोशीकपणाबद्दल आणि तिच्या विषयी असलेल्या प्रेमाबद्दल सांगतात. याशिवाय पागलखाण्यात होते त्यावेळी तिथल्या लोकांनी केलेली सेवा व केलेले प्रेम ते व्यक्त करतात. त्याचप्रमाणे वयाच्या वाढत्या टप्प्यांवर अनेक स्त्रिया येतात. त्यांच्याशी त्यांचे जुळलेले सौख्य दिसते. येथे या आत्मकथनात त्यांच्या आवती भोवती त्यांना सावरण्याचे आधार देण्याचे काम या व्यक्तिरेखा कश्या करतात यांचे वर्णन त्यांच्या आत्मकथनात येते.

कोणत्याही साहित्याचे सौंदर्य, कलात्मकता ही लेखनात वापरलेल्या भाषेवर अवलंबून असते. लेखक ज्या गावात वाढले, जगले, शिकले त्या परिसरातील बोलीचा वापर लेखक आपल्या लेखनात करतो. त्यामुळे परिसरातील म्हणी, शब्दप्रयोग, वाक्यप्रचार, बोलीतील लय, खटके, शब्दसौंदर्य यांचा प्रभाव या लेखनावर जाणवतो. तसेच गणेश चौधरी शिक्षणाने सुसंस्कारीत असल्यामुळे त्यांच्या भाषेवर प्रभाव दिसतो. येथे वास्तवाभिमुख शैलीचा वापर केल्यामुळे ह्या आत्मकथनातून जळगांव जिल्ह्याचे वातावरण दर्शन वाचकांना घडते.

कोणत्याही साहित्याची निर्मिती झाली असता. त्या साहित्याने सर्व कसोट्यांवर खरे उतरावे लागते. 'नागवा' या आत्मकथनाने या सर्व कसोट्या पूर्ण केल्या आहेत. साहित्यात येणारे अलंकार, उदाहरणे, विषेशणे तसेच जळगांव जिल्ह्यातील बोली भाषेचे विशेष येथे येतात. त्यांचप्रमाणे एका मनोरुग्णाने लिहिलेले हे आत्मकथन असल्यामुळे साहित्यात याचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. तसेच चौधरींच्या या लेखनामुळे वाचकांना नवीन असा विषय हाताळण्यास मिळाला आहे. त्यामुळे त्यांची उत्कंठा उंचावलेली दिसून येते.

त्याचबरोबर गणेश चौधरी यांच्या 'नागवा' या आत्मकथनाबद्दल अनेक तज्ज्ञांनी मते व्यक्त केली आहेत. त्यामध्ये काही विरोधी, काही चांगली मते मांडलेली आहेत. अनेक तज्ज्ञांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात. येथे त्याच्या दोषावरही प्रकाश टाकण्याचे काम केले जाते. खऱ्या अर्थाने एका वेगळ्या जगातील लोकांच्या भावविश्वाचे वास्तववादी जीवन दर्शन लेखकांने वाचकांना घडवून दिले आहे.

इतर वाङ्मयप्रकारापेक्षा साहित्यात नवीन रुढ झालेला 'पत्रात्मक आत्मकथन' या वाङ्मय प्रकाराने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. 'काचेचं मन' या पत्रात्मक आत्मकथनातून गणेश चौधरींनी एक वेगळा विषय मांडलेला आहे. ही पत्रे मनोरुग्णालयातून एका मनोरुग्णाने आप्त-स्वकियांना पाठवलेली आहेत. त्या पत्रांना साहित्यात श्रेष्ठ दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच आतापर्यंत फक्त आत्मनिरिक्षण केलेले साहित्य वाचकांनी वाचले होते. पण स्वत:चे अत्यंत कठोरपणे आत्मनिरिक्षण करुन ते लोकांच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न प्रथमच गणेश चौधरींनी केलेला आहे.

'काचेचं मन' या पुस्तकात जागो जागी त्यांच्या वेडाच्या खुणा जाणवतात येथे एका मनोरुग्णव्यक्तीने आपली मानसिकता सावरुन ही पत्रे लिहिली आहेत. या पत्राचा उपयोग मानसशास्त्राज्ञाना व्हावा व असा आजार ज्यांना झाला असेल त्यांना योग्य उपचार मिळावेत या इच्छेखातीर लिहिलेली आहेत. हे मांडत असताना त्यांना फक्त आपल्या दु:खाचाच पाढा यातून वाचला नाहीतर यातून त्यांनी विनोद, विषाद, उपरोध, विषण्णूता यासारखे विषय मांडतात म्हणजेच हे या पत्रातील एक वेगळेपण जाणवते ते कठोर आत्मनिरिक्षण करताना त्यांच्या हळवेपणाचा व भावूकतेचा प्रत्यय या साहित्यातून येतो. येथे गणेश चौधरींनी इतर साहित्यातील विषयापेक्षा वेगळा विषय मांडला आहे. म्हणजेच कोणत्याही साहित्यकृतीचे मुल्यमापण करताना ती इतर साहित्यकृती पेक्षा कशी वेगळी आहे. त्यामध्ये कोणता आशय, विषय आणि समस्या मांडलेल्या आहेत. त्याचा परिणाम लेखकावर झालेला असतो. येथे गणेश चौधरी हेच वेगळेपण मांडतात. साहित्यात नवा विषय प्रथमच गणेश चौधरींनी आणलेला दिसतो. हेच नाविण्य 'काचेचं मन' मध्ये दिसते. त्याचबरोबर एक विशेष या पत्रातून जाणवतो की ही पत्रे मनोरुग्णाने लिहिली आहेत. तरीही साहित्यात वेगळेपण सिद्ध केले आहे.

'काचेचं मन' या पुस्तकांची मांडणी तीन भागात केलेली आहे. यामध्ये पहिल्या भागात आप्त स्वकियांना पत्रे लिहिली आहेत. तर दुसऱ्या भागात साहित्यिकांना पत्रेलेखन केले आहे. तिसऱ्या भागात त्यांनी अत्यंत तटस्थपणे 'मृत्युपत्र' लिहितात. या सर्व पत्रांमधून त्यांची क्षणा-क्षणाला बदलणारी मनाची अवस्था वाचकाला चक्रावून टाकते. तसेच या मनोव्यापारातून त्यांनी मनाची अवस्था आणि भास, भ्रम, चक्कर, वेड यांचा सतत फिरणारा पंखा हे या खऱ्या लेखणाचे वैशिष्ठ्य आहे.

'काचेचं मन' या पुस्तकाच्या आशयाचे आत्मप्रगटीकरण व आत्मविश्लेषण करत असताना त्यांनी पहिल्या भागामध्ये आपल्या नातलगांना पत्रे पाठवली आहेत. यामध्ये एकून सतरा पत्रे आलेली आहेत. आई, दादा, दिवाकर, कल्पना तसेच रमेश, पेमा यांना पत्राद्वारे आपण आपले वेड कसे लपवले, त्यानंतर डॉक्टरांनी उपचार व्यवस्थित केले नाहीत त्यामुळे त्यांच्या सुप्त मनातील प्रवृत्तींनी आक्राळविक्राळ स्वरुप धारण केले. हे सर्व सांगत असताना त्यांनी कोणता ही आडपडदा ठेवलेला नाही. भास, भ्रम, चक्कर व वेड या भोवऱ्यात अडकलेल्या गणेश चौधरी यांना 'लोक काहीही बोलतात' असा आरोप ते करत. त्यांना लोक आपल्याविषयी बोलत आहेत, आपल्याला काहीतरी म्हणत आहेत, असे वाटत होते. हे त्यांनी आपल्या पत्नीला, आई-वडिलांना सांगितले. पण हा आजार मानसिक आहे. त्यांना 'हॅल्युसिनेशन्स' चा त्रास आहे हे लक्षात न आल्यामुळे त्यांना 'स्क्रिझोफ्रेनिया' कसा झाला ते या पत्राच्या माध्यमातून सांगतात. त्यांचे विक्षिप्त वागणे वाढले होते. त्यांचा परिणाम त्यांच्या शरिरावर ही झालेला दिसतो. म्हणजे येथे गणेश चौधरींनी लिहिलेल्या पत्रामधून एक गोष्ट लक्षात येते की, त्यांना समजून घेण्याचा किंवा त्यांच्या अशा वागण्याचा कोणी विचार केला नाही. ते असे वागतात ते त्यांच्या मनावर ताबा नाही. आई-वडिल तर त्यांच्या समोर बसून रडून त्यांना अस् वागू नकोस, घराण्याची आब्रु घालवू नको असे सांगत. पण त्यांच्या मानसिक स्थितीबद्दल कोणी विचार केला नाही. या आत्मकथनाच्या पहिल्या भागात गणेश चौधरी यांनी मानसरोगाबद्दल, पश्चातापदग्ध, अंत:करणाऱ्या कळवण्यातून स्वचिकित्सा केलेली आहे. त्याचबरोबर मनोदुभंतेच्या आपल्या स्वत:ला न कळलेल्या या आजाराबद्दल भेटलेल्या प्रत्येकाला सांगतात ही मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून गरज असलेली दिसून येते.

दुसऱ्या भागात त्यांनी साहित्यिकांना एकून नऊ पत्रे पाठविली आहेत. बाहेरच्या जगात आपल्याला ही काही स्थान आहे असा विश्वास निर्माण झाल्यानंतर ही पत्रे लिहिली आहेत. तसेच ही पत्रे लिहिण्यापाठीमागे मुख्य प्रेरणा म्हणजे बाहेरच्या जगाशी संबंध साधण्यासाठी लिहिली आहेत. 'तृषार्त' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला तेव्हा अनेकांचे सहकार्य लाभले. त्यावेळी त्यांना अनेकांनी निमंत्रण पत्रिका पाठविल्या पण डॉ. अडबेंना निमंत्रण पत्रिकेबरोबर एक पत्र लिहितात त्यांना वाटते आपले संबंध हे निमंत्रण पत्रिकेपूरते मर्यादित नाहीत तसेच त्यांनी दिनांक १४/०३/१९७४ रोजी भाऊसाहेबांना पत्र लिहिले त्यातून गुरु व शिष्य या नात्याचे वेगळेपण दिसून येते. त्याचबरोबर 'तृषार्त'च्या समारंभासाठी येऊ न शकलेल्य अनेकांनी त्यांना अभिनंदनपर पत्रे लिहिली आहेत. त्याचबरोबर त्यांना निशाजी, स्नेहांकिता, लिला काकासाहेब इ. अनेकांनी पत्रे पाठविली आहेत. माणसाच्या जीवनातील अनेक जिव्हाळ्याची, प्रेमाची नाती असतात अशाच मायेच वलय गणेश चौधरींच्या भोवती होते. त्यांच वलयाला नात्यांना दु:ख पोहचू नये म्हणून त्यांनी पत्र न पाठविण्याचा निर्णय घेतात. मनोविश्लेषणावरुन त्यांच्या वागण्याचा, बोलण्याचा विक्षिप्तपणा समजतो. त्यांचे पडसाद आपल्याला त्यांच्या साहित्यातून दिसतात. त्यांनी साहित्यिकांना पत्रे पाठविताना एक खबरदारी घेतात आपले मानसिक संतूलन संभाळूनच पत्रे लिहितात.

'काचेचं मन' या आत्मकथनाच्या शेवटच्या तीसऱ्या भागात अत्यंत आगळे-वेगळे 'मृत्युपत्र' लेखन केले आहे. हे 'काचेच्या मनाने' लिहिलेले अनुभव संपन्न पत्र लेखन आहे. या शापित मनाने गणेश चौधरींच्या जीवनामध्ये वादळ निर्माण करुन त्यांच्या सुखी स्वप्नांना सुरुंग लावला आहे. तसेच हे मृत्युपत्र म्हणजेच बेवारस मढ्याला अग्नी देण्यासाठी वारस नाही. अशा मनोरुग्णाने लिहिले आहे. त्याचप्रमाणे मृत्युपत्र लिहिण्यापाठीमागे दुसरे ही एक कारण आहे. त्यांच्या पत्नीची इच्छा पूर्ण करण्यासाठी ते लिहितात. मानवहा विश्वाच्या हातातील एक कठपुतळी आहे. त्याचे बोलणे, वावरणे हे सर्व परमेश्वर ठरवित असतो. येथे चौधरींचा परमेश्वरावर असलेला राग दिसून येतो.

'काचेचं मन' या पुस्तकाच्या मांडणीचा व लेखनपद्धतीचा विचार करता या तीनही भागात लिहिलेली पत्रे यातून व्यक्त झालेला आशय वेगळा आहे. पहिल्या भागात लेखक

आपल्या भाव-भावनांना कुठेही आवर घालत नाही. पण दुसऱ्या भागात पत्रलेखन करताना भावनांना सावरुन लेखन केले आहे. तर शेवटच्या भागात लेखकाने अत्यंत भावुकपणे 'मृत्युपत्र' लेखन केले आहे. इथे भाषा साधी, सोपी आहे. तसेच जळगांव जिल्ह्यातील ग्रामीण भाषेचा ठसा उमटलेला दिसतो. ही पत्रे लेखकाने घेतलेल्या अनुभवाची अभिव्यक्ती आहे. तसेच साहित्याचे गुण विशेष या आत्मकथनाला चिटकलेले आहेत. साहित्यात अशा पद्धतीने केलेले लिखान कमी प्रमाणा आढळते.

या दोन्ही आत्मकथनाच्या पाठीमागे लेखकाचा असलेला हेतू, तसेच दोन्ही आत्मकथनांची वैशिष्ठ्ये आणि यातून आलेल्या व्यक्तिरेखा ह्या वास्तववादी जीवनानुभवाचे खरेखुरे दर्शन वाचकांना घडवतात लेखकाने वापरलेली भाषा व निवेदनशैली, प्रामाणिक निवेदनाद्वारे अनुभव कथन करतात. वरील सर्व प्रकरणांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न एक अभ्यासक म्हणून केलेला आहे.